# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**वर्धा जिल्ह्यातील कृषिपंपाच्या वीज जोडण्या प्रलंबित असल्याबाबत**

**(१) १२७४९ (०४-०४-२०१५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यातील सुमारे ४ हजार ७०० कृषिपंपाच्या वीज जोडण्या प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रश्न मार्गी लावण्याबाबत पालकमंत्री यांनी आश्वासित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने वर्धा जिल्ह्यातील वीज जोडणीचा प्रश्न तातडीने सोडविण्याकरिता शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, त्याची अंमलबजावणी शासनामार्फत कधीपर्यंत करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०७-२०१७) :**(१) वर्धा जिल्ह्यामध्ये मार्च, २०१५ अखेर ४८३७ शेतकऱ्यांच्या कृषीपंप वीज जोडण्या प्रलंबित होत्या.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) वर्धा जिल्ह्यातील सदर प्रलंबित कृषीपंपाच्या वीज जोडणीसाठी विशेष पॅकेज-१ अंतर्गत सन २०१५-१६ करिता रु. ३१.६७ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला. सदर जिल्ह्यात सन २०१५-१६ मध्ये विशेष पॅकेज-१ अंतर्गत २१०५, पायाभूत आराखडा-२ योजनेअंतर्गत ११५७, जिल्हा वार्षिक योजना १५७, आरईसी (एसपीए) योजनेअंतर्गत ११७, डिडिएफ व इतर योजनेतंर्गत १०७७ असे एकूण ४६१३ कृषीपंपांचे ऊर्जीकरण करण्यात आले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील वीज वितरण कंपनीचे विभाजन करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(२) १६२९४ (१०-०८-२०१५). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीज वितरण कंपनीने (महावितरण) विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि उर्वरित महाराष्ट्र अशा चार प्रादेशिक भागात विभाजन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावाबाबत अभ्यास करण्यासाठी महावितरण कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकांना, इतर राज्याचा दौरा करुन अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्याचे, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार महावितरणचे विभाजन करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०६-२०१७) :**(१) व (२) महावितरण कंपनीचे विभाजन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही. परंतु कंपनीच्या कारभाराची व्याप्ती, संचलनातील मुद्दे व वीजगळती इ. बाबी विचारात घेऊन कंपनीची पुर्नरचना करुन विभागीय मंडळे स्थापन करण्याच्या दृष्टीने अभ्यास करण्यासाठी कंपनीस सूचना देण्यात आल्या होत्या.

(३) महावितरण कंपनीची पुनर्रचना करुन चार विभागीय परिमंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव अद्याप कंपनीच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### जळगाव जिल्ह्यात उस्मानिया पार्कमधील मिटरला दोन वर्षापासून विद्युत जोडणी दिली गेली नसल्याबाबत

**(३) २५२७७ (१६-०८-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यात उस्मानिया पार्कमधील नागरिकांनी दोन वर्षापूर्वी मीटर मिळावे म्हणून क्रॉम्प्टनकडे वारंवार मागणी केल्यानुसार काही महिन्यांनी मिटर मिळाले परंतू या मिटरला विद्युत जोडणी दिली नसल्याचे दिनांक ३० मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास अधिकृत वीज जोडणीसाठी वारंवार पाठपुरावा करुनही महावितरण, क्रॉम्प्टन यांनी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यामुळे अनेक नागरिकांनी वाहिन्यांवर हुक टाकले आहेत, हे खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे तेथील भागात अनेक समस्यांमुळे नागरिक त्रस्त झाले असून महापालिकेने सुविधा द्याव्यात अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२८-०६-२०१७) :** (१) व (२) जळगांव जिल्ह्यातील उस्मानिया पार्कमधील ८० नागरिकांना जून, २०१३ मध्ये नवीन वीज जोडणी देण्यात आली होती. या भागातील रोहित्र अतिभारीत झाल्यामुळे नवीन २ रोहित्र बसविण्याचे काम एप्रिल, २०१५ मध्ये पूर्ण करण्यात आले. यादरम्यान नवीन जोडण्या मागणीनुसार देण्यात आल्या आहेत जळगाव वितरण फ्रॅन्चाइझी करारातील तरतुदी नुसार दि. १०/०८/२०१५ रोजी मे. सी.जी.एल. सोबतचा करार रद्द केला गेला आणि वीज वितरण प्रणाली महावितरणने दि. १२/०८/२०१५ रोजी आपल्या ताब्यात घेऊन महावितरण कंपनीने कामकाजाला सुरुवात केली आहे व आता कंपनीकडून तात्काळ वीज जोडण्या देण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील यंत्रमागधारक कृती समितीच्या मागणीबाबत**

**(४) २९७५४ (२२-१२-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे यंत्रमागधारक कृती समितीव्दारे त्यांच्या मागण्यासंदर्भात माहे ऑगस्ट, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात मोर्चाचे आयोजन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोर्चेक-यांच्या मागण्या कोणत्या आहेत, तसेच सदर मागण्यांपैकी कोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत व उर्वरित मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०७-२०१७) :** (१) दिनांक १.०८.२०१५ रोजी मोर्चा काढण्यात आला होता.

(२) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या दिनांक २६.०६.२०१५ च्या वीज दर आदेशानुसार नवे वीज दर महावितरण कंपनीच्या ग्राहकांना दिनांक ०१.०६.२०१५ पासून लागू करण्यात आले होते. त्यामध्ये २७ अश्वशक्ती पेक्षा कमी विद्युत भार असलेल्या यंत्रमागधारकांच्या वीज दरामध्ये रु. ५.०६/- युनिट वरुन रु. ५.४३/- युनिट इतकी दरवाढ झाली. त्यामुळे त्यांच्या वीज दरात ३७ पैसे युनिट इतकी दरवाढ झाली. ही दरवाढ रद्द करण्याबाबत सदर यंत्रमागधारकांची मागणी होती. सदर मागणी विचारात घेऊन लघुदाब यंत्रमाग धारकांसाठी त्यावेळी वीजदर रु. २.६६ युनिट इतका करण्यात आला होता.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या आश्रमशाळांमधील शिक्षकांना वेतन अदा न केल्याबाबत**

**(५) ३१६९८ (२२-१२-२०१५). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या अमरावती, नाशिक, नागपूर आणि ठाणे विभागातील आश्रम शाळांमधील ५००० शिक्षकांना वेतन देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची तक्रार शिक्षक सेलचे प्रदेश उपाध्यक्ष यांनी मा.आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने ५००० शिक्षकांना वेतन अदा न करण्याची कारणे काय आहेत व शिक्षकांचे थकित वेतन किती कालावधीत देण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा (२०-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. या संदर्भात उपलब्ध दस्तऐवजांची/अभिलेखांची तपासणी केली असता शिक्षकांच्या वेतनासंदर्भात माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील प्रत्येक घरात वीज पोहचविण्याबाबत**

**(६) ४२१७३ (२०-०४-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक घरात पुढील तीन वर्षात वीज पोहचवली जाणार असून केंद्र शासनाच्या मदतीने सुमारे ४५०० कोटी रुपये खर्चून ग्रामीण व शहरी भागातील वीजवितरण प्रणाली सुधारली जाईल अशी घोषणा मा.ऊर्जा मंत्री यांनी केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.ऊर्जा मंत्री यानी केलेल्या घोषणेनुसार घराघरात वीज पोहचविण्याबाबत शासनाने कोणते नियोजन केले आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०७-२०१७)** :(१) हे खरे आहे.

(२) दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेमध्ये राज्यातील ग्रामीण भागातील ३,९४,१४१ दारिद्र्यरेषेखालील लाभार्थीसहित १२,४८,४७४ घरगुती ग्राहकांना नवीन वीज जोडणी देणे, ८३७ वाहिन्याचे वाहिनी विलगीकरण करणे, वीज वितरण प्रणाली सक्षमीकरण करणे, सांसद आदर्श ग्रामयोजनेच्या ६९ गावांमध्ये वीज वितरण प्रणालीचे सक्षमीकरण करणे व महाराष्ट्र राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये २१५ नवीन उपकेंद्रे, १०० उपकेंद्राची रोहित क्षमतावाढ, १०९२४ वितरण रोहित्रे, १९४१७ किती उच्चदाब वाहिनी, ६२१८.४ किमी लघुदाब वाहिनी उभारणे इत्यादी कामांचा समावेश आहे.

एकात्मिक ऊर्जा विकास योजनेमध्ये राज्यातील शहरी भागात ३,४९८ किलोव्हॅट क्षमतेचे सौर प्रकल्प उभारणे, ६,२१,४७३ नवीन मीटर बसविणे तसेच महाराष्ट्र राज्यातील २५४ शहरामध्ये वीजवितरण प्रणाली सक्षमीकरण करण्यासाठी १२८ नवीन उपकेंद्रे, ८९ उपकेंद्रांची रोहित्र क्षमतावाढ, ५७०५ वितरण रोहित्रे, ४५३२.०२ किमी उच्चदाब वाहिनी, ३२३९.९५ किमी लघुदाब वाहिनी उभारणे इत्यादी कमाचा समावेश आहे.

सदर दोन्ही योजनेच्या कामांच्या निविदा महावितरण कंपनीतर्फे काढण्यात आल्या असून कंत्राटदारांना एप्रिल, २०१७ मध्ये कार्यादेश देण्यात आले आहेत.सदर कामे दोन वर्षात पूर्ण करावयाची आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्हयात जेएसडब्ल्यू, डोलवी कंपनीने केलेल्या वायूप्रदूषण व जलप्रदूषणाबाबत**

**(७) ४६८४४ (२८-०४-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील जेएसडब्ल्यू, डोलवी कंपनीच्या वायूप्रदूषण, जलप्रदूषण तसेच कांदळवनाच्या कत्तलीबाबत पर्यावरण संरक्षण आणि जनजागृती संघटनेचे महाराष्ट्र अध्यक्ष यांनी उपजिल्हाधिकारी, जि. रायगड यांना माहे डिसेंबर, २०१५ च्या सुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार उपजिल्हाधिकारी यांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२९-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही .

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातारा जिल्हयातील करमोडी पंपहाऊससाठी दहा केव्हीची अतिरिक्त विद्युत लाईन टाकण्याबाबत**

**(८) ५०९९८ (२०-०४-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील करमोडी पंपहाऊससाठी दहा केव्हीची अतिरिक्त विद्युत लाईन टाकावी लागणार असून त्यासाठी पाच कोटी रुपये डिपॉझीट द्यावे लागणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने सदरची रक्कम भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०६-२०१७) :**(१) सातारा जिल्ह्यातील करमोडी योजना नसून उरमोडी उपसा सिंचन योजना आहे. ती पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करणेकरिता २४ एम.व्ही. ए. अतिरीक्त विद्युत भाराची गरज असून त्याकरीता रु. ९.२४ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

(२), (३) व (४) जलसंपदा विभागाकडून कामाच्या गरजेनुसार प्राप्त होणारा निधी विचारात घेऊन सदरचे काम महापारेषण कंपनीकडून करण्यात येईल.

---

**सोलापूर शहरातील उघड्या विद्युत ट्रान्सफार्मरमुळे नागरिकांच्या जिविताला धोका असल्याबाबत**

**(९) ५२२५५ (२०-०४-२०१६). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील अनेक विद्युत ट्रान्सफार्मर उघडयावर असल्याने नागरिकांना धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने महावितरणने शहरातील सर्व डीपींचा सर्वे करण्याची हमी दिली होती मात्र एक महिना उलटूनही अद्याप सर्वेचे काम पूर्ण झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने करुन उघडयावर असलेल्या डीपीची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-०५-२०१७) :** (१), (२) व (३) महावितरण कंपनीकडून ट्रान्सफॉर्मर्सची नियतकालिक (Periodical) देखभाल व दुरुस्ती केली जाते. माहे जानेवारी, २०१६ पासून नियतकालिक देखभाल व दुरुस्तीअंतर्गत सोलापूर शहरातील ६३ ट्रान्सफॉर्मर्सच्या डिस्ट्रीब्युशन बॉक्सच्या उघडया दरवाजांची दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**निमगाव केतकी (ता.इंदापूर, जि.पुणे) परिसरातून गेलेल्या सोलापूर-पुणे उच्च दाबाच्या टॉवर लाईनबाबत**

**(१०) ५४०९५ (१६-०८-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निमगाव केतकी (ता.इंदापूर, जि.पुणे) परिसरातून गेलेल्या पॉवर ग्रीड कोर्पोरेशनच्या सोलापूर-पुणे उच्च दाबाच्या टॉवर लाईनमुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतातील पिकात विद्युत प्रवाह उतरल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतात विद्युत उतरल्याने शेतकऱ्यांच्या शेतात काम करण्यास मजूर घाबरल्याने शेतात काम करणे बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात १९ लक्ष परिवारापर्यंत अद्याप वीज पोहचली नसल्याबाबत**

**(११) ५५८०८ (१६-०८-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १९ लक्ष परिवार आणि ३५० छोट्या वाड्यावस्त्या आणि गावांमध्ये वीज पोहचली नसल्याने गावे अंधारात असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने या भागात अपारंपारिक स्त्रोतांद्वारे विज पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२८-०६-२०१७)** :(१) राज्यात एकूण १८,७३,०८७ ग्रामीण परिवारांच्या वीज जोडण्यांचे विद्युतीकरणाचे काम बाकी आहे. त्यापैकी १२,४८,४७४ ग्रामीण घरगुती वीज जोडण्यांचे काम दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजने अंतर्गत प्रस्तावित आहेत. उर्वरित ६,२४,६१३ वीज जोडणीचे काम जिल्हा नियोजन विकास समिती योजने अंतर्गत वार्षिक टप्प्या टप्प्याने करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच राज्यात एकूण २९८ गावे आणि २०९३ वाडी पाडे यांचे पारंपारिक पध्दतीने विद्युतीकरण करण्याचे काम बाकी आहे.
(२) व (३) घनदाट जंगल आणि डोंगराळ भाग असल्याकारणाने ज्या गावांचे विद्युतीकरण करणे शक्य नाही अशा गावांचे महाऊर्जामार्फत अपारंपारिक उर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### विदर्भ व मराठवाड्यात उद्योगाना सवलतीचा वीज दर लागू करण्याबाबत

**(१२) ५५९९३ (२२-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भ व मराठवाड्यात उद्योगाना उत्तेजन देण्यासाठी सवलतीचा वीज दर लागू करण्याचे शासनाने जाहीर केल्यानंतर यासंदर्भात उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली होती व या समितीने सादर केलेल्या अहवालावर विचार करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त दोन्ही समित्यांनी सादर केलेल्या अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे व त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत व याबाबत कार्यवाही करण्यासाठी किती कालावधी लागणे अपेक्षित आहे?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) विदर्भ, मराठवाडयातील उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी सदर भागातील औद्योगिक विद्युत ग्राहकांना (अ) इंधन समायोजन आकार, (ब) उद्योगांच्या कार्यक्षमतेवर आधारित व (क) नवीन उद्योगांकरिता प्रोत्साहनपर सवलत देण्याबाबत शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५, दिनांक २९ जून, २०१६ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली शहरात बनावट कागदपत्रांच्या आधारे बियर बारला परवानगी देण्यात आल्याबाबत**

**(१३) ६१५५३ (२०-०८-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली शहरातील माने चौक, गुलाब कॉलनी, शंभर फुटी रोड या ठिकाणी बनावट कागदपत्रांच्या आधारे बियर बारला परवानगी देण्यात आल्याची घटना माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विरोधात अनेक सामाजिक संस्था व नागरिकांनी आंदोलने केली हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती यामधील दोंषीविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-०६-२०१७) :**(१), (२), (३) व (४) सांगली जिल्ह्यातील तीन नागरिकांनी हॉटेल एस.एस. रेस्टॉरंट बारला दिलेल्या अनुज्ञप्तीबाबत दि. २८.३.२०१६, दि. ११.४.२०१६ व दि. १६.४२०१६ रोजी एकूण तीन तक्रार अर्ज दाखल केले.

जिल्हाधिकारी, सांगली यांच्या मान्यतेने दि. ९.६.२०१६ अन्वये सदरहू अर्ज दप्तरी दाखल करण्यात आले.

दरम्यानच्या कालावधीत तक्रारदार यांनी जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे दि. १२.०५.२०१६ रोजी निवेदन दिले. सुनावणी देवूनही तक्रारदार यांना दि. १६.५.२०१६ रोजी मोर्चा काढला.

जिल्हाधिकारी, सांगली यांनी तक्रारदार व अनुज्ञप्तीधारकांसमवेत दि. ३०.५.२०१६, दि. ६.६.२०१६ व दि. ५.७.२०१६ अशा एकूण तीन सुनावण्या घेवून तक्रारदारांचा अर्ज निकाली काढला व तक्रारदार यांना वाद अर्जाचा खर्च म्हणून रक्कम रु. ५०००/- प्रतिवाद्यांना द्यावा असा आदेश दि. २२.८.२०१६ रोजी पारीत केला.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात सातत्याने भारनियमन होत असल्याबाबत**

**(१४) ६२२१५ (१८-०८-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात सातत्याने विद्युत भारनियमन होत असल्यामुळे डहाणूच्या बंदरपट्टी भागांतील चिंचणी, वरोरा वानगांव, साखरे लघुउद्योग, डाय मेकर्स इत्यादी लहान मोठ्या व्यवसायांवर विपरीत परिणाम होऊन त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास पालघर जिल्हयातील जव्हार, मोखाडा या आदिवासी भागात मोठया प्रमाणात भारनियम होत असल्याने आदिवासी रहिवाशांना मोठया प्रमाणात त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच डहाणू (जि.पालघर) तालुक्यात धरमपूर आदिवासीवाडीच्या दीड हजार लोकवस्ती असलेल्या वाडींवर मागील तीन महिने वीज पुरवठा बंद असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त भागात विद्युत भारनियम कमी करुन बंद असलेला वीज पुरवठा सुरु करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-०६-२०१७) :**(१) डहाणूच्या बंदरपट्टी भागांतील चिंचणी, वरोर, वानगाव या परिसरात ३३/११ केव्ही देदाळे उपकेंद्रातून वीज पुरवठा होतो. सदर उपकेंद्रातून ११ केव्ही वरोर, ११ केव्ही वानगाव या उच्चदाब वाहिन्याव्दारे परिसरातील लघु उदयोग व डायमेकर्स इत्यादी व्यवसायदारांना वीज पुरवठा होतो. या वाहिन्यांवर माहे डिसेंबर, २०१५ पासून भारनियमन होत नसून विद्युत प्रणालीवर आलेल्या ताणामुळे काही अपवादात्मक वेळीच भारनियमन केले जाते.
(२) जव्हार मोखाडा या भागात माहे डिसेंबर, २०१५ पासून भारनियमन बंद असून काही अपवादात्मक परिस्थितीतच भारनियमन केले जाते.
(३) दि. ०२/०४/२०१६ रोजी धरमपूर (ता. डहाणू, जि. पालघर) येथील विद्युत रोहित्र नादुरुस्त झाले होते ते दि.१२/०५/२०१६ रोजी बदलून नविन रोहित्र बसविण्यात आले असून वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.
(४) व (५) याबाबत महावितरण कंपनीकडून चौकशी करण्यात आली असून धरमपूर (ता. डहाणू जि. पालघर) येथील आदिवासी वाडी येथील नादुरुस्त रोहित्र बदलण्यासंबंधी शाखा अभियंता यांचे कडून हलगर्जीपणा झाल्याचे निदर्शनास आले असून त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी करुन त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे वाल्ये (ता.राजापूर जि.रत्नागिरी ) या गावात संपूर्ण दारुबंदी होणेबाबत**

**(१५) ६४४९८ (२०-०८-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वाल्ये (ता.राजापूर जि.रत्नागिरी) या गावात परराज्यातून, मुख्यत्वे गोवा येथील मोठ्या प्रमाणात चोरट्या मार्गाने अवैध दारु विक्रीसाठी येते, हे खरे आहे काय,

(२)  असल्यास, येथील ग्रामपंचयतीने दिनांक ३० फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या बैठकीत आणि दिनांक १० मे, २०१६ रोजीच्या ग्रामसभेत गावात संपूर्ण दारुबंदी करण्याचा ठराव मंजूर करुन दारुबंदीच्या मागणीसाठी सदर ठराव जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे पाठविलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीकरुन मौजे वाल्ये गावात संपूर्ण दारुबंदी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-०४-२०१७) :**(१) अंशतः खरे आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने सन २०१४ व २०१५ या वर्षामध्ये सदर गावात परराज्यातून आलेली अवैध दारु विक्री प्रकरणी ३ गुन्हे नोंदविले असून याप्रकरणी अटक केलेल्या ३ आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. या ठिकाणी मद्य विक्री व वाहतुकीवर लक्ष ठेवून कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(२) हे खरे नाही. ग्रामपंचातीने पारीत केलेला कोणताही ठराव जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी येथे प्राप्त झालेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे शिवडाव (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या गावातील वाडी क्र. १ ते ३ मध्ये विद्युत खांबांची दुरावस्था झाल्याबाबत**

**(१६) ६४८०६ (१८-०८-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे शिवडाव (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) या गावातील वाडी क्र. १ ते ३ या वाड्यांमध्ये १९७२-७३ मध्ये विद्युत पुरवठा करण्यात आलेल्या विद्युत उपकरणांची ३५ वर्षातून एकदाच दुरुस्ती करण्यात आल्याने विद्युत पोलची दुरावस्था होऊन बऱ्याच विद्युत वाहक तारा जमिनीच्या दिशेने लोबंकळत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वाडीत विद्युत पुरवठा सातत्याने खंडीत असल्याने वारंवार या भागातील शेती पिकांचे मोठे नुकसान होऊन अंधारात राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०७-२०१७) :** (१) मौजे शिवडाव (ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग) मध्ये एकूण १७ वाडया आहेत. सन १९७२-७३ पासून वेळोवेळी गंजलेले पोल बदलण्याचे काम आवश्यकतेप्रमाणे देखभालीच्या योजनेअंतर्गत पूर्ण करण्यात आले आहे. इन्फ्रा-२ योजनेअंतर्गत एकूण ३१ लघुदाब वाहिनीचे पोल बदलण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे सैल झालेल्या काही तारा पूर्ववत करण्यात आलेल्या आहेत. पोल गंजणे तसेच वीज वाहीन्या सैल होणे ही सततची प्रक्रिया असून आवश्यकतेप्रमाणे सदर कामे महावितरणकडून वेळोवेळी पूर्ण करण्यात येत आहेत.

(२) महावितरण कंपनीकडून दैनंदिन कामकाजामध्ये प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निराकरण विहीत कालावधीत करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे बांधपाडा ग्रामपंचायत (ता.उरण, जि.रायगड) हद्दीत स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर बसविण्याबाबत

**(१७) ६५११७ (०७-०१-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बांधपाडा ग्रामपंचायत (ता. उरण, जि. रायगड) हद्दीत स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर बसविण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण मंडळाकडे वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मौजे धूतूम ग्रामपंचायत (ता. उरण, जि. रायगड) हद्दीतील जुने सडलेले पोल व तारा बदलणे, ट्रान्सफॉर्मर नविन जास्त क्षमतेचा बसविणे, मिटर नादुरुस्त असल्याने तात्काळ नविन मिटर देण्यात यावे, चिरनेर विभागासाठी भूमिगत केबल टाकणे अशा अनेक मागण्या केल्या आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागण्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.

मौजे बांधपाडा ग्रामपंचायत येथे ३१५ केव्ही क्षमतेचे स्वतंत्र रोहित्र उभारुन कार्यान्वित करण्यात आले आहे.

(२) व (३) मौजे धुतूम ग्रामपंचायत हद्दीतील २०० केव्हीए क्षमतेची २ रोहित्रे, ६३० केव्हीए क्षमतेचे १ रोहीत्र नव्याने बसविण्यात आले आहेत व ५०० केव्हीए क्षमतेचे १ रोहीत्र बदलून तेथे ६३० केव्हीए क्षमतेचे रोहीत्र बसविण्यात आले आहेत. तसेच ६ लघुदाब वाहिनीचे पोल

बदलविण्यात आले आहे. तसेच चिरनेर विभागात भूमिगत वाहिन्या टाकण्याऐवजी सध्या अस्तित्वात असलेल्या उच्चदाब वाहिन्याने नुतनीकरण (१० किमी) दिनदयाळ उपाध्याय योजनेअंतर्गत करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ऐरोली सेक्टर-५ मध्ये महावितरण कंपनीचे साहित्य विनावापर पडून राहिल्याबाबत**

**(१८) ६५२०७ (०७-०१-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐरोली (नवी मुंबई) सेक्टर-५ मधील महावितरण कार्यालयाच्या बाजूला असणाऱ्या मोकळ्या मैदानात महावितरण कंपनीचे ट्रान्सफार्मर, पिलर बॉक्स, केबलचे बॉक्स व इतर कोट्यवधी रुपयांचे साहित्य विनावापर पडून राहिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरक्षेच्या कारणास्तव हे साहित्य योग्य ठिकाणी हलवावे म्हणून तेथील नागरिकांनी महावितरण कार्यालयाकडे तक्रार करूनही सदर साहित्य अद्याप हलविण्यात आलेले नाही याची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती साहित्य हलविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१) माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये मे. राजदिप कंपनीने काही नवीन साहित्य तसेच पायाभूत आराखडा-२ योजनेमध्ये काढलेले जुने साहित्य मोकळया मैदानात ठेवलेले होते.

(२) व (३) महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आली आहे. सदर साहित्य कंपनीस सूचना दिल्यानंतर तातडीने नोव्हेंबर, २०१६ मध्ये हलविण्यात आले असून सदर मैदानात कोणतेही साहित्य ठेवलेले नाही.

तसेच नवीन साहित्य इन्फ्रा-२ योजनेअंतर्गत महावितरण कंपनीच्या कामाकरिता वापरण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महावितरण व महापारेषण कंपन्यांच्या वीज देयकाच्या थकबाकीबाबत**

**(१९) ६५२७३ (२७-०१-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य विद्युत मंडळाच्या वितरण व पारेषण वीज कंपन्यांची शेतक-यांच्या कृषी पंपाना दिलेल्या वीज देयकांची थकबाकी २० कोटी रुपये असून ती वसूल करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतक-यांच्या कृषीपंपाना दिलेल्या वीजेची थकबाकी किती व खासगी उद्योग कंपन्यांची वीज शुल्काची थकबाकी किती आहे,
(३) असल्यास, ही थकबाकी वसूल न करता विद्युत मंडळाने ५६ हजार कोटींची दरवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती राज्य विद्युत मंडळाच्या वितरण व पारेषण वीज कंपन्यांची शेतक-यांच्या कृषी पंपाना दिलेल्या वीज देयकांची थकबाकी वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०७-२०१७) :**(१) राज्यातील कृषी ग्राहकांकडून महावितरण कंपनीस माहे मार्च, २०१७ पर्यंत एकूण रु. १८,३११.२० कोटी एवढी थकबाकी देय आहे.
(२) माहे मार्च, २०१७ अखेर राज्यातील कृषी ग्राहकांची वीज बिलाची एकूण थकबाकी रु. १८,३११.२० कोटी एवढी असून औद्योगिक ग्राहकांची वीज बिलाची एकूण थकबाकी रु. ४८१.५७ कोटी एवढी आहे.
(३) व ४) विद्युत मंडळाने रु. ५६ हजार कोटीची दरवाढ केलेली नसून रु. ५६ हजार कोटी हा महावितरण कंपनीला लागणारा एकूण महसूली खर्च आहे. महावितरण कंपनीकडून विविध योजनेद्वारे थकबाकीची वसुली करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई विभागात विद्युत उपकरणाची दुरावस्था झाली असल्याबाबत**

**(२०) ६५६५६ (१०-०१-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई विभागात ऐरोली, घेणसोली, कोपरखैरणे, वाशी, बेलापूर, नेरुळ, इत्यादी भागात विद्युत महावितरण कंपनीचे डी.पी.बॉक्स, ट्रान्सफार्मर इत्यादीची दुरावस्था झाल्यासंदर्भात ओ. आणि एम तसेच यु आणि एम योजनेंतर्गत वाशी व नेरूळ विभागात देखभाल दुरुस्तीची सुरु असलेली कामे पूर्ण करण्यात आली आहेत काय,
(२) तसेच वाशी व नेरूळ विभागातील ओ आणि एम योजनेंतर्गत डीपीआर मध्ये प्रस्तावित करण्यात आलेली कामे सुरु करण्यात आली आहेत काय,
(३) प्रश्न भाग क्र. (१) व (२) मधील कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७)** : (१) प्रणाली सुधारणा आणि देखभाल (U & M) योजनेंतर्गत वाशी विभागात १८३मिनी/फिडर पिलर बदलण्यात आले आहेत, ६ ट्रान्सफॉर्मर्सना फेन्सींग करण्यात आले आहे, ६५१५ वॉल बॉक्स बसविण्यात आले आहे.

(२) व (३) वाशी व नेरुळ विभागातील एकूण रु. ७५.५२/- कोटींची कामे महावितरण कंपनीमार्फत O & M अंतर्गत प्रस्तावित आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील सातपूर, अंबड औद्योगिक वसाहतीमध्ये नियमित वीज पुरवठा करण्याबाबत**

**(२१) ६५९२८ (०७-०१-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील सातपूर, अंबड औद्योगिक वसाहतीमध्ये, वारंवार वीज पूरवठा खंडीत होत असल्याने कामगार वर्ग बसून ठेवणे, मालाच्या ऑर्डर्स वेळेवर पूर्ण न होणे, तयार माल पाठविण्यास विलंब होणे, मशिन जळणे आदि मोठया प्रमाणात उद्योजकांचे आर्थिक नुकसान होत असल्या प्रकरणी, महावितरणचे मुख्य अभियंता यांना आयमाच्या अध्यक्षांनी दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौकशीअंती सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने अंबड औद्योगिक वसाहतीस नियमित वीज पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७)** : (१) हे खरे आहे.

आयमाच्या अध्यक्षांनी वीजेच्या समस्यासंबंधी लेखी निवेदन दि. २४.०८.२०१६ रोजी मुख्य अभियंता, महावितरण, नाशिक परिमंडळ यांना दिले आहे.

(२) मुख्य अभियंता, महावितरण, नाशिक परिमंडळ, यांनी महापारेषण अधिकारी यांचे समवेत बैठक आयोजित करुन विशेषत: शनिवारी व इतर दिवशी रात्रीच्या वेळेत उच्चदाब उपकेंद्रातून निघणाऱ्या ११ के.व्ही. वाहिन्यांवरील विद्युत पुरवठयाची मागणी कमी होत असल्यामुळे थोडयाशा जास्त दाबाने (ओव्हर व्होल्टेज) वीज पुरवठा होत होता. त्याऐवजी योग्य दाबाचा वीज पुरवठा करणेसंबंधी सूचना दिल्या होत्या.

कार्यकारी अभियंता, महावितरण नाशिक शहर विभाग-१ यांनी अतिरिक्त कार्यकारी अभियंता, अंबड उपविभाग यांना योग्य दाबाचा व अखंडीत वीज पुरवठा, औद्योगिक वसाहतीस करणेबाबत दि. १४.९.२०१६ रोजी सूचना दिल्या होत्या व त्यानुसार कार्यवाही करण्यात आली.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गुहागर येथील ३३ के.व्ही. वीज उपकेंद्राचे काम अपूर्ण असल्याबाबत**

**(२२) ६५९६६ (०७-०१-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर (जि. रत्नागिरी) शहरासाठी पायाभूत आराखडा एक अंतर्गत माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान महावितरणच्या ३३ के.व्ही. उपकेंद्राचे काम सुरु होऊन ते गत दोन वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाची नव्याने निविदा काढण्यात आल्याची माहिती गत अधिवेशनात मा. मंत्री, उर्जा यांनी दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत तीन महिन्यात निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन काम सुरु करण्यास विलंब करत असलेल्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१), (२) व (३) महावितरण कंपनीने गुहागर उपकेंद्राचे काम दि. २४.०२.२०१४ रोजी मे. प्रतिभा इलेक्ट्रीकल्स यांना दिले होते. ठेकेदाराने वारंवार सूचना देऊनही काम पूर्ण न केल्यामुळे सदर कंत्राट दि. १८.१०.२०१६ रोजी रद्द करण्यात आले. पुर्ननिविदेद्वारे सदर काम दि. १०.११.२०१६ रोजी मे. प्रकाश इलेक्ट्रीकल्स यांना देण्यात आले असून, सध्या उपकेंद्राचे व वाहिनीचे काम प्रगतीपथावर आहे. काम पूर्ण करण्याचा कालावधी बारा महिन्यांचा आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मेहकर व लोणार तालुक्यातील (जि. बुलढाणा) विद्युत वितरण कंपनीसंदर्भात उद्‌भवणा-या विविध समस्यांबाबत**

**(२३) ६६५९९ (०७-०१-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीज वितरण कंपनीने शेतक-यांना १२ तास वीज पुरवठा करावा असा शासनाने आदेश काढला असतानाही वीजपुरवठा होत नसून मेहकर येथील (जि. बुलढाणा) १३२ केंद्रावरून लव्हाळा, हिवरा आश्रम, देऊळगाव महि, साखरखेर्डा या चारही ३३ केव्ही केंद्रावर एकाच वाहिनीवरुन वीज पुरवठा केला जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) तसेच लाईनमनच्या रिक्त पदांमुळे लाइनमनचे काम हेल्परकडून करुन घेण्यात येत आहे असेही निदर्शनास आले असून शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, मेहकर व लोणार तालुक्यातील (जि. बुलढाणा) विद्युत वितरण कंपनीसंदर्भात उद्भवणा-या शेतक-यांच्या विविध समस्यांबाबत दि.७.९.२०१६ रोजी वा त्या सुमारास स्थानिक कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात स्थानिक लोकप्रतिनिधींनी जनता दरबार घेतला होता, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या समस्यांबाबत वितरण कंपनीने कशा प्रकारे निराकरण केले वा करण्याचे आश्वासन दिले आहे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१) मेहकर तालुक्यातील काही कृषी ग्राहकांना अतिउच्चदाब वाहिन्यांची अपुरी वहन क्षमता व अपुरी स्थापित क्षमता यांना तांत्रिक अडचणींमुळे १२ तास वीज पुरवठा करता आला नव्हता.

मेहकर येथील १३२/३३ केव्ही उपकेंद्रामधून निघणाऱ्या ३३ केव्ही साखरखेर्डा या वाहिनीवरुन हिवरा आश्रम, देऊळगाव मही व साखरखेर्डा या उपकेंद्राना वीजपुरवठा केला जातो. लव्हाळा येथे उपकेंद्र अस्तित्वात नसून लव्हाळा कृषी व गावठाण वाहिनीद्वारे ३३/११ केव्ही पिंपळगाव उंडा उपकेंद्रातून वीज पुरवठा केला जातो.

(२) मेहकर व लोणार तालुक्यातील तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या सेवा निवृत्तीमुळे रिक्त झालेल्या जागेवर मंडळ कार्यालयाकडून बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांची नोंदणीकृत संस्थेमार्फत नेमणूक करण्यात आलेली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सदर मुद्यांच्या अनुषंगाने उपस्थितांना पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली:-

उच्चदाब व लघुदाब वाहिन्यांची देखभाल व दुरुस्ती करणे, नादुरुस्त रोहित्रे /सीटी बदलविणे, रोहित्रांची क्षमता वाढ करणे इ. कामांबाबत एजन्सीची नियुक्ती करण्यात आली असून सदरील काम प्रगतीपथावर आहेत. तसेच वीज ग्राहकांच्या बिलींगच्या तक्रारीबाबत रिडिंग एजन्सी बदलविण्यासाठी निविदा काढून नियुक्तीची प्रक्रीया अंतिम टप्प्यात आलेली आहे.

---

## चिमूर तालुक्यातील राजनांदगाव वरोरा या पारेषण वाहिनीचे काम शेतक-यांची परवानगी न घेता केल्याबाबत

**(२४) ६६७५४ (०७-०१-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिमूर तालुक्यातील भिसी, शंकरपूर, आंबेनेरी, खडसंगी, नेरी आदि शिवारात रायपूर-राजनांदगांव - वरोरा ट्रान्समिशन लिमिटेड कडून ७६५ के.व्ही.डी.सी. राजनांदगाव-वरोरा या पारेषण वाहिनीचे काम शेतक-यांची कसलीही परवानगी न घेता व पिकाची पर्वा न करता नविन टॉवर उभारणीचे काम सुरु, आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या सुमारास स्थानिक पोलिस स्थानकांत तक्रार करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.

चिमूर तालुक्यातील भिसी, शंकरपूर, आंबेनेरी, खडसंगी, नेरी आदि शिवारात रायपूर-राजनांदगांव-वरोरा ट्रान्समिशन लि. कडून ७६५ के.व्ही.डी.सी. विद्युत वाहिनीचे काम भारतीय विद्युत अधिनियम, २००३ चे कलम १६४ आणि ६८ अन्वये सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व ४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**त्र्यंबकेश्वर (जि. नाशिक) येथील आश्रमशाळेत जेवण निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(२५) ६७७५६ (११-०१-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील आदिवासी सेवा समिती संचलित प्राथमिक, माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसोबतच याच संस्थेच्या वसतिगृहातील ७० ते ८० मुले ही संस्थेतील जेवण निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे दररोज शाळेपासून दोन कि.मी. अंतरावर असलेल्या ओम वाहेगुरू अन्न छत्रात जात असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आश्रमशाळेत चौकीदाराचे पदही रिक्त असल्याने विद्यार्थ्यांची सुरक्षा धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्न भाग १ व २ नुसार शासनाने चौकशी करून येथील विद्यार्थ्यांना दर्जेदार जेवण देण्याबाबत व येथील चौकीदाराचे पद भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२०-०६-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) शासनाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांना सकाळचा नाश्ता, दुपारचे व सायंकाळचे जेवण दिले जाते. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने कंत्राटी पध्दतीने चौकीदाराचे पद भरण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण डोंबिवली पालिकेच्या वीज देयकावर महावितरणकडून अधिभार वसूल केला जात असल्याबाबत**

**(२६) ६७९८९ (०७-०१-२०१७). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका ही सार्वजनिक सेवा देणारी संस्था असून नियमानुसार वापरलेल्या वीज बिलावर नियमानुसार अधिभार लावता येत नाही मात्र पालिकेच्या वीज बिलावर मागील दहा वर्षापेक्षा अधिक काळ महावितरणकडून १६ टक्के अधिभार वसूल केला जात आहे असे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात अधिभारापोटी पालिका प्रशासनाने ६५ लाख ५४ हजार रुपयांचा भरणा महावितरणकडे केला आहे ,हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०६-२०१७) :** (१) कल्याण मंडल १ अंतर्गत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे एकूण ६६५ वीजग्राहक आहेत. त्यापैकी ५४९ ग्राहकांना नियमानुसार विद्युत शुल्क लावण्यात येत नाही. उर्वरित ११६ ग्राहकांची स्थळ तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. त्यानुसार वीज शुल्क माफीकरिता पात्र असलेल्या १०७ ग्राहकांचे वीज शुल्क माफ करण्यात आले आहे. ६ ग्राहक वीज शुल्क माफी करिता पात्र नाहीत व ३ ग्राहकांचा वीज पुरवठा कायमस्वरुपी खंडीत केला आहे.

(२) कल्याण मंडल १ अंतर्गत एप्रिल, २०१५ ते मार्च, २०१६ या वर्षामध्ये कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने त्यांच्या नावे असलेल्या एकूण ६६५ विद्युत देयकांपैकी ११६ देयकांची रुपये ६७.५८ लाख एवढी रक्कम विद्युत शुल्कापोटी महावितरणकडे भरणा केली आहे.

(३) व (४) महावितरणमार्फत चौकशी करण्यात येऊन उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिमूर नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या १० गावांचा व उर्वरीत ३० गावांचा विद्युत पुरवठा वेगळा करण्याबाबत**

**(२७) ६८७४४ (०७-०१-२०१७). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपुर जिल्ह्यातील चिमूर नगर परिषदेसह चाळीस गावांना एकाच विद्युत फिडरवरुन विद्युत पुरवठा करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चाळीस गावांपैकी एका गावातील विद्युत पुरवठ्यामध्ये काहीही तांत्रिक अडचण आल्यास संपूर्ण विघुत पुरवठा खंडित करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वारंवार विघुत पुरवठा खंडित न होण्यासाठी चिमूर नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या १० गावांचा व उर्वरीत ३० गावांचा विद्युत पुरवठा वेगळा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

चिमूर नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या गावांना ५ स्वतंत्र विद्युत वाहिनीद्वारे वीज पुरवठा करण्यात येतो व उर्वरित गावांना १ स्वतंत्र विद्युत वाहिनीद्वारे वीज पुरवठा करण्यात येतो.

(२) ज्या वाहिनीवर तांत्रिक बिघाड असतो त्याच वाहिनीवरील गावे त्या कालावधीकरीता खंडीत करुन तांत्रिक बिघाड काढला जातो व त्यामुळे त्या वाहिनीवरील गावे त्या कालावधीकरीता बंद राहतात. परंतु त्या कालावधीमध्ये इतर वाहिनीवरील गावांचा वीजपुरवठा अखंडीत सुरु राहतो.

(३) इन्फ्रा -२ योजनेंतर्गत ३३ केव्ही खडसंगी उपकेंद्राचे काम प्रगतीपथावर आहे. सदर उपकेंद्र कार्यान्वीत झाल्यानंतर चिमूर उपकेंद्रातून स्वतंत्र ११ केव्ही वाहिनीद्वारे चिमूर नगरपरिषदे अंतर्गत येणाऱ्या गावांना वीज पुरवठा करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापुर येथील कॅस्प्रो इंडस्ट्रीज कंपनीच्या अन्यायकारक विजेच्या देयकांबाबत

**(२८) ६९४१० (०७-०१-२०१७). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर येथील कॅस्प्रो इंडस्ट्रीज या कंपनीने कण्टिन्युअसऐवजी नॉन कण्टिन्युअस गटातील स्वस्त दरातील वीज देण्याची मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीच्या मागणीकडे महावितरणने दुर्लक्ष करुन ज्यादा दराने देयक वसूल केल्याने उक्त कंपनीला सुमारे १५ लाख रुपये अतिरिक्त भरावे लागले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात सदरहू कंपनीने ग्राहक निवारण आयोगाकडे धाव घेतली असता आयोगाने सदरहू रक्कम व्याजासह परत करण्याबाबत महावितरणाला आदेश दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती यासंदर्भात दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच दोषी अधिकाऱ्यांकडून अतिरिक्त रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा कण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) मा. वीज नियामक आयोगाने केलेल्या दंडात्मक आदेशाविरुध्द महावितरण कंपनीने मा. आयोगाकडे दिनांक २८.१०.२०१६ रोजी फेर याचिका दाखल केली आहे. त्यावरील निकाल अद्याप प्रलंबित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोंबिवली(जि.ठाणे) एम.आय.डी.सी.परिसरातील ओअॅसिस या रासायनिक कंपनीमधून होणारे प्रदूषण**

**(२९) ६९६२१ (२७-०१-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली एम.आय.डी.सी.परीसरात फेज २ मध्ये असलेल्या ओअॅसिस या रासायनिक कंपनीमधून दिनांक ३ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास रात्री १० वाजल्यापासून धुराचे लोट परिसरात पसरल्याने परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याने याबाबत नागरिकांनी स्थानिक पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा नोंद करून प्रशासनाबाबत नाराजी व्यक्त केल्याचे दिनांक ५ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डोंबिवली औद्योगिक परिसरातील रासायनिक कंपन्या शासकीय नियमांचे उल्लंघन करून वारंवार आरोग्यास घातक असलेले प्रदूषण करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,कारवाईची सद्यस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. रामदास कदम (२९-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

प्राप्त माहितीनुसार दिनांक ०३/१०/२०१६ रोजी मे. ओऑसिस केमिकल इंडस्ट्रिज, प्लॉट नं. डब्ल्यु- ५७, एमआयडीसी, फेज २ मधील उदयोगात रासायनिक आम्ल हाताळणी करताना काही प्रमाणात (अंदाजे १० लि.) सांडले गेले व ते पावसाच्या पाण्यात मिसळल्याने धुर निर्माण झाला. तसेच या दरम्यान बॉयलर मधील अतिरिक्त वाफ सुदधा बाहेर सोडण्यात आली होती. याबाबत तात्काळ उपाययोजना करण्यात येवून सदरचा धुर तात्काळ बंद करण्यात आला. याबाबत मानपाडा पोलीस स्टेशन डोंबिवली यांचेकडून संबंधित घटनेच्या तक्रारी बाबतचे पत्र महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिनांक १०.१०.२०१६ रोजी प्राप्त झाले.

सदर घटनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सदर उद्योगास प्रस्तावित आदेश दिनांक ०४.१०.२०१६ रोजी पारित केले होते. याबाबत सदर उद्योगाने योग्य ती खबरदारी घेण्याचे पत्र दिनांक ०७.१०.२०१६ रोजी दिलेले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वासाच्या अनुषंगाने रात्रीचे गस्ती पथक तयार केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील विष्णुपुरी प्रकल्पाचा वीज पुरवठा तात्काळ सुरु करण्याबाबत**

**(३०) ७०२६४ (०७-०१-२०१७). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील विष्णुपुरी प्रकल्पाचा वीज पुरवठा तात्काळ सुरु करण्याचे आदेश राज्याचे उर्जा मंत्री यांनी नुकतेच माहे सप्टेंबर,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदेशाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे तसेच किती गावांचा फायदा होणार आहे वा होत आहे,
(३) असल्यास, चौकशीअंती नांदेड जिल्हयातील विष्णुपुरी प्रकल्पाचा वीज पुरवठा तात्काळ सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :** (१), (२) व (३) जिल्हाधिकारी, नांदेड यांनी त्यांच्या बैठकीमध्ये विष्णुपुरी प्रकल्पाचा वीज पुरवठा सुरु करण्याबाबत दि. ०९.०९.२०१६ रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली होती. त्याअनुषंगाने दिनांक १०.०९.२०१६ रोजी सदर प्रकल्पाचा वीज पुरवठा सुरु करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे नांदेड जिल्हयातील ११९ गावांना फायदा झाला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात एक गाव एक ग्रामविद्युत व्यवस्थापन योजना सुरू करण्याबाबत**

**(३१) ७०४५६ (०७-०१-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), डॉ.सतीश**

**(अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जनतेला तातडीने वीज सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी एक गाव एक ग्रामविद्युत व्यवस्थापन योजना सुरू करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑक्टोबर, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे स्वरूप काय आहे, व त्याची अंमलबजावणी राज्यात सुरू झाली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती या योजनेची अंमलबजावणी सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०७-२०१७) :**(१), (२) व (३) ग्राम विकास विभागामार्फत राज्यातील ३००० लोकसंख्यापर्यंतच्या ग्रामपंचायतींमध्ये महावितरण कंपनीमार्फत पुरविण्यात येणाऱ्या काही सेवांकरिता ग्रामपंचायतींनी "फ्रॅन्चायझी" म्हणून काम करण्याबाबत शासन निर्णय क्र. व्हीपीएम-२०१६/प्र.क्र.८/पं.रा-३, दि. २०.१०.२०१६ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार पात्र ग्रामपंचायतींनी रितसर जाहिरातीद्वारे अर्ज मागवून त्यामधून गुणवत्तेच्या आधारे आय.टी.आय. (इलेक्ट्रीकल किंवा विद्युततंत्री) प्रमाणपत्र धारक योग्य उमेदवाराची "ग्राम विद्युत व्यवस्थापक" म्हणून निवड करण्यात येते. त्यानंतर निवड केलेली व्यक्ती वाहिनीवर काम करण्यास पात्र असल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतर ग्रामपंचायतीकडून त्यांना ११ महिन्यांकरिता तात्पुरत्या स्वरुपाचा कार्यादेश देण्यात येतो. सदर ग्राम विद्युत व्यवस्थापकांना ग्रामपंचायती अंतर्गत निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक व कृषि ग्राहकांचे मिटर रिडींग घेणे, वीज देयके वाटप करणे, ब्रेक डाऊन अटेन्ड करणे, डी. ओ. फ्युज टाकणे, रस्त्यावरील दिवाबत्ती देखभाल व बंद पडलेले दिवे बदलणे, नवीन जोडणीची कामे करणे व थकबाकीपोटी वीज पुरवठा खंडीत करणे ही कामे देण्यात येतात. सदर कामांकरिता ग्राम विद्युत व्यवस्थापकास प्रती ग्राहक रु.९/- प्रमाणे प्राप्त होणारे उत्पन्न किंवा रु. ३०००/- यापैकी जी रक्कम जास्त असेल ती महावितरण कंपनी मार्फत देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अवनखेड (ता.दिंडोरी,जि.नाशिक) येथील विद्युत मनोरा कोसळल्याबाबत**

**(३२) ७०७८२ (१५-०२-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अवनखेड (ता.दिंडोरी,जि.नाशिक) येथील पॉवरग्रीड कंपनीचा विद्युत मनोरा अचानक कोसळून खाली पडून यामध्ये तीन कामगार जखमी झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आहे, हे खरे आहे काय.

(2) असल्यास, याची शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीअंती जखमी कामगारांना संबंधित कंपनीने नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-०६-२०१७) :** (१) होय हे खरे आहे,
(२) सदर विद्युत मनोऱ्यात वापरण्यात आलेल्या सामग्रीची शासनमान्य प्रयोगशाळेमधून तपासणी करुन घेण्यात आली असता ते योग्य असल्याचे निदर्शनास आले. परंतु सदर विद्युत मनोरा उभारण्याचा कामातील प्रक्रियात्मक त्रुटीमुळे सदरची घटना घडल्याचे निदर्शनास आले असून त्याची भविष्यात पुनरावृत्ती होऊ नये याची दक्षता पॉवर ग्रीड कंपनीकडून घेण्यात येत आहे.
(३) सदर घटनेत जखमी झालेल्या तीन कामगारांना प्रत्येकी रुपये एक लाख इतका मोबदला सदर कंपनीकडून देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सुहदली (ता.सेनगाव) येथे वीजेची तार तुटल्याने तीन जनावरे मृत्युमुखी पडल्याबाबत**

**(३३) ७२०६९ (०७-०१-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुहदली (ता.सेनगाव) येथे वीजेची तार तुटल्याने तीन जनावरे मृत्युमुखी पडल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये व त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरण कंपनीच्या वीजेच्या तारा जुन्या झाल्या असून एमएसईबीच्या वतीने दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) त्यामुळे संबंधित शेतक-यास आर्थिक संकट कोसळल्यामुळे त्या शेतक-यास शासनाच्या वतीने आर्थिक मदत देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०६-२०१७) :**(१) व (२) हे खरे आहे.
दि. २३/०८/२०१६ च्या मध्यरात्री वादळीवारा व पाऊस यामुळे सुलदली गावातील लघुदाब वाहिनीच्या तारा तुटून सदर अपघात झाला.
(३) मृत्यू पावलेल्या तीन जनावरांसाठी नुकसान भरपाई म्हणून दि. ३१.०१.२०१७ रोजी रु.६०,०००/- संबंधित श्री. रायाजी ग्यानोबा मुटकुळे यांना अदा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महावितरण कंपनीच्या ग्राहकांनी सुमारे ३२०० कोटी रुपये थकविले असल्याबाबत**

**(३४) ७२१३१ (०७-०१-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीज बिलांचा भरणा न केल्याने कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित करण्यात आलेल्या महावितरण कंपनीच्या ३२ लाख घरगुती आणि व्यावसायिक वीज ग्राहकांनी सुमारे ३२०० कोटी रुपये थकविले असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, संबधित वीज ग्राहकांकडून वीज बिलांची थकीत रक्कम वसूल करण्याबाबत शासनाकडून कोणत्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत वा येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-०६-२०१७) :** (१) महावितरण कंपनीच्या सुमारे २९,१४,३०२ घरगुती व व्यावसायिक वीज ग्राहकांची माहे सप्टेंबर, २०१६ अखेर सुमारे रु. २,४६९.३९ एवढी थकबाकी होती.

(२) संबंधित वीज ग्राहकांची वीज बिलांची थकीत रक्कम वसूल करण्याबाबत महावितरण कंपनीमार्फत स्थळ पाहणी, वसूली मोहीम व लोकअदालतद्वारे प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच कायमस्वरुपी बंद ग्राहकांसाठी व्याज व दंड माफीची “नवप्रकाश योजना २०१६-१७” माहे नोव्हेंबर, २०१६ पासून सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महावितरणच्या अकोला मंडळात काही ग्राहकांना जादा वीज आकारणीचे वीजदेयक देण्यात येत असल्याबाबत**

**(३५) ७२५३६ (१०-०१-२०१७). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणच्या अकोला मंडळात मागील दोन महिन्यांपासून काही ग्राहकांना ४५ दिवसांचे वीजदेयक तर काहींच्या हाती जादा वीज आकारणीचे वीजदेयक देण्यात येत असल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला शहरामध्ये प्रत्येक घरी रिडींग घेणारा कर्मचारी प्रत्येक महिन्याला ठरलेल्या तारखेला न येणे, रिडिंग व्यवस्थित न होणे, येणाऱ्या देयकांत विनाकारण वाढ दिसत असणे अशा प्रकारच्या तक्रारी समोर येत आहेत, हे खरे आहे काय,

(३) तसेच अकोला शहरात कंपनीतर्फे गतीमान विद्युत विकास आराखडा योजने अंतर्गत उद्योजकांसारख्या बड्या ग्राहकांच्या मीटर रीडींगसाठी यापूर्वी स्वयंचलित यंत्रे लावण्यात आली होती मात्र ही यंत्रणा कोलमडल्याने कोट्यवधींच्या गतीमान विद्युत विकास योजनेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून बड्या ग्राहकांच्या थकबाकीचा आकडा कोट्यवधींवर पोहचला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त मुद्यांबाबत चौकशी केली आली आहे काय,चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,यातील दोषी असणा-या अधिका-यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०६-२०१७) :** (१) व (२) अकोला विभागामध्ये सप्टेंबर, २०१६ मध्ये ३ नवीन बिलींग एजन्सीज नेमल्याने व ऑक्टोबर, २०१६ पासून काही भागामध्ये मोबाईल ॲपद्वारे रिडींग घेणे सुरु केल्याने अडचणी निर्माण झाल्या होत्या. परंतु जादा वीज आकारणीचे देयक देण्यात आले नव्हते.

(३) डिसेंबर, २०१६ पासून अकोला शहरातील सर्व १८२ उच्चदाब ग्राहकांना स्वयंचलित मीटर रिडींग (AMR) यंत्रणेद्वारे रिडींग घेण्यात येते.अकोला मंडळांतर्गत नोव्हेंबर, २०१६ अखेर शासकीय पाणीपुरवठा योजना वगळता चालू उच्चदाब ग्राहकांची थकबाकी रु. १३ लक्ष एवढी होती.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विशाळगड (ता.शाहुवाडी) येथील तोफ व मुंडा दरवाजाची दुरावस्था झाल्याबाबत**

**(३६) ७३८६५ (१४-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी तालुक्यातील विशाळगड हे एक ऐतिहासिक ठिकाण असून दरवर्षी इथे लाखो पर्यटक भेट देत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ऐतिहासिक वास्तूचे काही पर्यटकांनी विद्रुपीकरण केल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विशाळगड या ऐतिहासिक वास्तूचे जतन करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) गड स्वच्छता अभियानांतर्गत सदर परिसरातील २६ स्वयंसेवी संस्थाच्या सुमारे ७०० स्वयंसेवकांच्या सहभागातून विशाळगड किल्ल्याची व परिसराची स्वच्छता करण्यात आली. मुंढा दरवाजा व इतर ऐतिहासिक वास्तुवर लिहिलेली नावे व इतर मजकूर काढून टाकण्यात आला आहे. भविष्यात अशा घटना घडू नयेत म्हणून पुरातत्व विभागाकडून सुचनाफलक लावण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरीमध्ये असणा-या थिबा राजाच्या राजवाड्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(३७) ७३९२६ (२०-०४-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), अॅड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरीमध्ये असणा-या थिबा राजाच्या राजवाड्याची दुरावस्था झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त राजवाड्याच्या दुरावस्थेबाबत म्यानमारच्या उपराष्ट्रपतीसह आलेल्या पाहुण्यांनी तसचे जिल्हाधिकारी यांनी दुरुस्तीच्या कामाची पाहणी केली असता नाराजी व्यक्त केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर राजवाडयाचे दुरुस्तीचे काम पुरातत्व विभागाच्या देखरेखीखाली खाजगी ठेकेदारांकडून सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त राजवाडयाचे काम दर्जेदार होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (०३-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) म्यानमारच्या उपराष्ट्रपतींच्या भेटीच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून जिल्हाधिकारी यांनी दि.०३.१२.२०१६ रोजी या राजवाडयाच्या जतन व संवर्धनाच्या कामाची पाहणी केली. त्यावेळी चालू असलेले काम संथगतीने चालू असल्यामुळे जिल्हाधिकारी यांनी नाराजी व्यक्त केली होती.

(३) पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाकडे राज्य संरक्षित स्मारकांच्या जतन व दुरुस्तीचा अनुभव असलेल्या कंत्राटदाराची नामिकासूची आहे. त्या नामिकासूचीमधील कंत्राटदाराकडून हे काम सुरु आहे.

(४) थिबा राजवाडयाची दुरावस्था झाली नसल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही. तथापि हे काम जलद गतीने होण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे शिवणे (ता. गुहागर, जि.रत्नागिरी) येथील नादुरूस्त नळपाणी पुरवठा पाणी योजनेच्या नुतनीकरणाबाबत

**(३८) ७४१८४ (२०-०४-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिवणे (ता.गुहागर,जि.रत्नागिरी) येथील नादुरूस्त नळपाणी पुरवठा योजनेचे नूतनीकरणासाठी सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाचे अंदाजपत्रक व आराखडा तयार करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, सदर कामासाठी किती निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर (०३-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) मौजे शिवणे (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथील नादुरुस्त नळपाणी पुरवठा पाणी योजनेच्या रु.१०.०० लक्ष इतक्या किंमतीचे दुरुस्तीचे काम सन २०१६-१७ च्या टंचाई कार्यक्रमांतर्गत सुरु करण्यात आले आहे.

(३) सन २०१६-१७ च्या टंचाई कार्यक्रमांतर्गत सदर कामासाठी रु.१०.०० लक्ष इतकी तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## मारेगांव येथील स्वर्गीय चिंधुजी पुरके आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याबाबत

**(३९) ७४३३८ (२८-०४-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ, मारेगाव येथील स्वर्गीय चिंधुजी पुरके आदिवासी आश्रम शाळेतील ६० विद्यार्थ्यांना माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या सुमारास भोजनामधून विषबाधा झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रमशाळेत ३६६ विद्यार्थी शिक्षण घेत असून या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीअंती दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना स्वच्छ व सकस आहार देण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०४-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे. मारेगांव (जि.यवतमाळ) येथील चिंधुजी पुरके आश्रमशाळेतील ५८ विद्यार्थ्यांना पाण्यातून विषबाधा झाल्याचे निदर्शनास आले. या सर्व विद्यार्थ्यांना दिनांक १२.१.२०१७ रोजी विद्यार्थ्यांना ग्रामीण रुग्णालय,मारेगांव येथे दाखल करण्यात आले होते.

उपचारानंतर त्याच दिवशी ४२ विद्यार्थ्यांना औषधोपचार करुन सोडण्यात आले. तर ११ विद्यार्थ्यांना दिनांक १३.१.२०१७ रोजी सोडण्यात आले. उर्वरित ५ विद्यार्थ्यांना शासकिय रुग्णालय, यवतमाळ येथे दाखल करण्यात आले. या विद्यार्थ्यांना दिनांक १५.१.२०१७ रोजी रुग्णालयातून सोडण्यात आले.

त्यानंतर सर्व विद्यार्थांची प्रकृती उत्तम आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली. दुषित पेयजलामुळे विषबाधा झाल्याचे दिसून आले आहे. या अनुषंगाने संबंधित दोषींवर कार्यवाही करण्याबाबत प्रकल्प कार्यालय, पांढरकवडा यांचे पत्र दिनांक ०८.०२.२०१७ अन्वये शाळा व्यवस्थापकांना निर्देश देण्यात आले.
तथापि संबंधित संस्थेने तत्पुर्वीच दिनांक ०७.०२.२०१७ पासून श्री. पी.बी.कुडमेथे, अधिक्षक व डी.ए. मानकर, मदतनीस यांना निलंबित केले आहे. तसेच श्री. पी.एस,चहाणकर, प्राथमिक मुख्याध्यापक, श्री. पी.व्ही. जाधव, प्रभारी माध्यमिक मुख्याध्यापक, श्री. जे.एम.जुनघरी,
प्रयोगशाळा परिचर व श्रीमती एम.डी. पुसनाके, कामाठी यांची पुढील एक वर्षिक वेतनवाढ रोखण्यात आली असल्याचे अध्यक्ष, शाळा व्यवस्थापनाने दिनांक १०.०२.२०१७ च्या पत्रान्वये कळविले आहे.
(४) विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्यासाठी RO फिल्टर व वॅाटर कुलर बसविण्यात आले आहेत. तसेच विद्यार्थ्यांना सकस आहार देण्याबाबत संस्थेला सूचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धारणी (जि.अमरावती) तालुक्यातील आमनेर ऐतिहासिक किल्ल्याची झालेली दुरावस्था**

**(४०) ७४३४५ (२०-०४-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारणी (जि.अमरावती) तालुक्यातील आमनेर ऐतिहासिक किल्ल्याची दुरावस्था झाल्याने त्याचे अस्तित्व नष्ट होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त किल्ल्याच्या दुरुस्तीकरिता व विशेष दर्जा मिळण्याकरिता पुरातत्व विभागाने योजना आखली आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने किल्ल्याच्या दुरुस्तीकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०६-२०१७) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. त्यामुळे सदर किल्ल्याच्या दुरुस्तीकरीता व किल्ल्यास राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा देण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील माळी समाजाने विविध मागण्या घेऊन रॅली काढल्याबाबत**

**(४१) ७५१५४ (२०-०४-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील भिडे वाड्याचा विकास करून त्याचे राष्ट्रीय स्मारकात रुपांतर व्हावे, मंजूर आराखड्याप्रमाणे फुले वाड्याचा विकास त्वरित करावा, नायगाव येथे सावित्रीबाई फुले यांचे राष्ट्रीय स्मारक व्हावे इ. विविध मागण्या घेऊन माळी समाजाने रॅली काढल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने माळी समाजाने केलेल्या मागणी नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (२९-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर अतारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने अधिक्षक अभियंता (भवन), पुणे महानगरपालिका, पूणे यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी सहायक संचालक ,पुरातत्व विभाग, पूणे यांना असे कळविले आहे की , भिडेवाडा ही मिळकत अद्यापपर्यंत पूणे महानगरपालिकेच्या ताब्यात आली नसल्यामुळे या ठिकाणी विकास करण्यात आलेला नाही. सदर मिळकतीबाबत भूसंपादनाची कार्यवाही भूसंपादन व व्यवस्थापन विभागाकडून सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर येथील करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिर राज्य संरक्षित स्मारक होण्याबाबत

**(४२) ७५४२२ (०६-०५-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिर राज्य संरक्षित स्मारक होण्याबाबत २४ दुकानदारांनी हरकती दाखल केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त हरकतीचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, उक्त मंदिर राज्य संरक्षित होण्यामध्ये निर्माण झालेला अडथळा दूर करण्याच्या दृष्टीने व हरकतीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,याबाबत सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२९-०६-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर दुकानदार मंदिराच्या आवारातील संरक्षक तटातील ओवरीत पुजेचे साहित्य विकत असून मंदिर संरक्षित करत असताना तटबंदी संरक्षित करण्याची आवश्यकता नसून याबाबत त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात यावे व तशी संधी त्याना देण्यात यावे अशा स्वरुपाची हरकत घेण्यात आली.

(३) उक्त मंदिर राज्य संरक्षित होण्यामध्ये कोणताही अडथळा नसून प्राप्त हरकती व सुचनांवर सुनावणी घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

काही हरकतींबाबत सुनावण्या झाल्या असून काही हरकतींवर सुनावणी घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुरबाड ( जि.ठाणे ) तालुक्यातील तळवली अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या दयनीय अवस्थेबाबत**

**(४३) ७५८६२ (२७-०३-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील तळवली अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची दयनीय अवस्था झाली असून पावसाळयात आश्रमशाळेतील छताच्या छिद्रातून वर्गखोल्यांत पाणी साचलेले असल्यामुळे मुलांना पाण्यात बसून शिक्षण घ्यावे लागत असल्याचे माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना थंडीत नदीवर आंघोळ करावे लागणे ,सर्व विधी उघडयावर कराव्या लागत असतांना आश्रमशाळेतील मुख्याध्यापक, अधिक्षक आणि संस्थाचालक यांच्या मनमानी कारभाराची अदयापी चौकशी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) तसेच आश्रमशाळेतील वर्गखोल्या तातडीने दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच दोषींविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, ?

**श्री. विष्णु सवरा (१३-०७-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) वृत्तपत्रातील बातमीच्या अनुषंगाने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर यांनी चौकशी केली असता, त्यात तथ्य आढळून आले नाही. त्यामुळे दोषी व्यक्तीविरुध्द कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे चिखलडोंगरे (ता. वसई,जि. पालघर) येथे अति उच्च दाबाचे उपकेंद्र मंजूर करणेबाबत**

**(४४) ७८४२२ (२८-०४-२०१७). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चिखलडोंगरे (ता. वसई,जि. पालघर) स.नं. ३०४ विरार (प.) येथे अती उच्च दाबाचे २२०/२२ के.व्ही. चे महापारेषण कंपनीचे उपकेंद्र मंजुर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उपकेंद्रासाठी लागणा-या जमीनीचे संपादनाचे काम पूर्ण झाले काय,

(३) असल्यास, या उपकेंद्रासाठी लागणा-या जमीनीचा आगाऊ ताबा देण्याचा प्रस्ताव आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, हया उपकेंद्राच्या प्रस्तावाची सद्यस्थिती काय आहे?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०७-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) २२० के.व्ही. चिखलडोंगरी उपकेंद्रासाठी जमीन अधिग्रहण प्रस्ताव महापारेषण कंपनीने जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे सादर केलेला होता. तो आता महसूल व वन विभागाच्या विचाराधीन आहे.

---

## सोलापूर जिल्हयातील करमाळा येथील क्रिडा संकुलासमोरील दारुचे दुकान इतरत्र हलविण्याबाबत

**(४५) ७९५४४ (२८-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) येथील क्रिडा संकुलासमोरील दारुचे दुकान इतरत्र हलविण्यात यावे अशी मागणी दि.९ सप्टेंबर, २०१६ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदनाव्दारे आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय तसेच सदरहु दुकान हलविण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-०६-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रस्तूत अनुज्ञप्ती जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या दि.३०/०७/२०१३ च्या आदेशान्वये बंद करण्यात आली होती. सदर आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिली असल्यामुळे अनुज्ञप्ती दि.३१/०३/२०१७ पर्यंत कार्यरत होती. त्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महामार्गापासून ५०० मीटर अंतराच्या आत येत असल्याने सदर अनुज्ञप्ती बंद करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नेवासा ( जि. अहमदनगर) तालुक्यातील V R S फूड व C P F फूड कंपन्याकडून होणाऱ्या प्रदूषणाबाबत

**(४६) ७९७९७ (२०-०४-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि अहमदनगर) या तालुक्यातील V R S व C P F या दोन फूड कंपन्या प्रदूषणाच्या नियमांचा कायम भंग करीत असून या दोन्ही कंपन्या प्रदुषणामुळे पर्यावरणाची हानी करतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंपन्यांवर तसेच विहित मानकानुसार जिल्ह्यातील सर्वच कारखान्यांची प्रदूषण तपासणी न करणाऱ्या कर्मचाऱ्यावरही कठोर कारवाई करावी अशी मागणी स्थानिक नागरिक व स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त दोन्ही कंपन्यांची प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नियमाप्रमाणे तपासणी होऊन सदर कंपन्यांना नोटीस देऊन कारवाई करणे जरुरीचे असतानाही या कडे प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कायम दुर्लक्ष करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले व उक्त कंपन्यांवर तसेच संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (२७-०६-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
मे. VRS फुड लिमीटेड या कंपनीला दि-२४/०१/२०१७ रोजी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने व तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत वेळोवेळी दिलेल्या भेटी दरम्यान पाण्याचे नमुने गोळा करण्यात आले आहे. त्याच्या पृथकरण अहवालावरुन असे निदर्शनास येते की, प्रक्रिया केलेले पाणी हे विहीत मर्यादेत आहे, तसेच प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पाहणीच्या वेळी आजुबाजुच्या परिसरातील विहीरीचे व तळयाचे पाण्याच्या नमुन्याच्या पृथकरण अहवालावरुन असे दिसते की, सदरील पाणी शेती पिकांना वापराकरीताच्या मानंकनाच्या मर्यादेत आहे. तसेच उद्योगाच्या पहाणी दरम्यान आढळलेल्या त्रुटीन्वये उद्योगाला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मांडळामार्फत क्र. १६२ दि.१४/०२/२०१७ अन्वये रोजी नॉन कंप्लाइन्स लेटर पाठविण्यात आले होते व पुढील कार्यवाहीसाठी प्रस्तावित कलेले आहे. मे. CPF फुड या कंपनी विरुध्द कोणतीही तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त नाही. तथापि उद्योगाच्या संमतीपत्रातील त्रुटीबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने उद्योगास कारणे दाखवा नोटीस दिनांक ३१.०३.२०१७ रोजी देण्यात आलेली आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलडाणा जिल्यातील आश्रमशाळा व वसतीगृहास पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(४७) ८०१९६ (२०-०४-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा, चिखली, शेगांव, खामगांव व लोणार (जि.बुलढाणा) या तालुक्यांतील आश्रमशाळा व वसतीगृहास जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत पाणी पुरवठा योजना मंजूर करणे

बाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत शासनास निवदेन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त योजनेंतर्गत पाणी पुरवठा मंजूर करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०१-०७-२०१७) :** (१) होय. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, बुलडाणा यांना निवेदन दिले आहे.

(२) सदर योजनांच्या कामासाठी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन २०१७-१८ या चालू वर्षाकरीता निधीची मागणी करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे कोसेसरी (ता.डहाणू, जि.पालघर) येथे सुर्या नदीवर पूल बांधण्याबाबत**

**(४८) ८०५२२ (१२-०४-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोसेसरी (ता.डहाणू, जि.पालघर) येथील सुर्या नदीवरील पूलाच्या बांधकामाबाबत आदिवासी विकास विभागाच्या विचाराधीन असलेल्या प्रस्तावास मान्यता मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूल बांधण्याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०४-०७-२०१७) :** (१) सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात रस्ते व पुलाच्या नवीन कामांचा समावेश करण्यासाठी मार्च, २०१६ पर्यंत मोठया प्रमाणावर मागण्या प्राप्त झाल्या होत्या. प्राप्त मागण्यांपैकी केवळ १०% मागण्या मान्य करणे शक्य झाले आहे. मान्य करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये मौजे कोसेसरी ( ता. डहाणू ,जि. पालघर ) येथील सुर्या नदीवरील पुलाच्या बांधकामाचा समावेश करण्यात आलेला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बिहार राज्याप्रमाणे दारुबंदीची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(४९) ८२२०३ (२८-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिहार राज्याप्रमाणे दारुबंदीची अंमलबजावणी करण्याबाबत राज्य शासन आवश्यक कार्यवाही करीत नसल्याने भूमाता ब्रिगेड दारुमुक्तीसाठी लढा देणार असल्याचे तृप्ती देसाई यांनी सांगितल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दारुमुळे अनेक कुटूंबावर विपरित परिणाम होत असून तसेच महिलांवरील अत्याचाराच्या प्रमाणातही वाढ झाल्याचे निदर्शनास येत असून दारुबंदीची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-०७-२०१७) :** (१) व (२) अंशत: खरे आहे. श्रीमती तृप्ती देसाई, अध्यक्षा, भूमाता ब्रिगेड यांनी दि.२१.७.२०१६ रोजी मा.मंत्री, राउशु यांना महाराष्ट्र दारुमुक्त घोषित करण्याबाबतचे निवेदन केले होते.

दारुबंदीबाबत शासनाने शासन आदेश, दि.२५ मार्च, २००८ आणि शासन अधिसूचना, दि.१२ फेब्रुवारी, २००९ अन्वये कार्यपध्दती विहित केली असून त्यानुसार प्रस्ताव प्राप्त झाल्यास कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डिग्रस क-हाळे(ता. हिंगोली) या परिसरातील शेतशिवारात बोअरवेल घेण्यात येत असल्याबाबत**

**(५०) *८३८३३* (०६-०५-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डिग्रस क-हाळे (ता. हिंगोली) या परिसरातील शेतशिवारात दहा बोरिंगमशीनद्वारे भुर्गभातील डिझेल तपासणीच्या नावाखाली बोअरवेल घेण्याचे काम काही दिवसांपासून सुरु असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याच भागात शेतात घेतलेल्या बोअरवेलमध्ये विहिर फोडण्यासाठी जिलेटींन टाकून त्याचे आवाज केले जात असून याबाबत विचारणा केली असता जमिनीमध्ये डिझेल शोधण्याचे काम सुरु असल्याचे सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नूसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०६-०७-२०१७) :** (१) सदर ठिकाणी भूगर्भातील हायड्रोकार्बनचे साठे असण्याची शक्यता तपासण्याकरीता टू-डी सेस्मिक डेटा संकलन करण्यासाठी ऑईल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन (ओ.एन.जी.सी.) हया केंद्र शासनाच्या सार्वजनिक कंपनीच्या एजन्सीकडून सदरचे काम करण्यात आले होते.

(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.